**<u>ठळक बातम्या</u>**

- उत्कृष्ट दर्जाच्या चित्रीकरणासाठी राज्यात २ अत्याधुनिक स्टुडियो उभारण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा/ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते निफ्टी वेव्हज् इंडेक्सचं उद्घाटन

- वेव्हज परिषदेत वेव्हज बाजारानं पहिल्या दीड दिवसात केला २५४ कोटी रुपयांचा व्यवसाय

- पुढच्या चार वर्षांत देश दुष्काळमुक्त करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांची ग्वाही

**आणि**

- अहिल्यानगरचे माजी आमदार अरुण जगताप यांचं निधन

**<><><><><>**

चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी महाराष्ट्रात दोन अत्याधुनिक स्टुडिओ उभारले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. मुंबईत सुरू असलेल्या वेव्हज् परिषदेत भारत पेव्हेलियनला मुख्यमंत्र्यांनी आज भेट दिली, त्यावेळी त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. या दोन स्टुडिओच्या उभारणीसाठी प्राईम फोकस आणि  गोदरेजसोबत सामंजस्य करार केले आहेत. या स्टुडिओंमधे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रीकरण करता येणार आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गोदरेजच्या सहाय्याने पनवेल मधे दोन हजार एकर जागेवर चित्रनगरी उभारली जाणार असून यामुळे मोठ्या प्रमाणात  रोजगार निर्मिती होणार असल्याचंही ते म्हणाले.

आता चित्रनगरी उभारण्यासाठी जागेची नाही तर तंत्रज्ञानाची गरज आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले....

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (१.५० ते २.१४)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज राष्ट्रीय शेअर बाजाराच्या Nifty Waves Index चं अनावरण केलं. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातल्या ४३ कंपन्याच्या समभागांचा सहभाग या निर्देशांकात आहे.

**राज्य सरकारने** आज दोन विदेश विद्यापीठांशी सामंजस्य करार केले. नवी मुंबई इथं सिडकोच्या पुढाकाराने एज्यु सिटी तयार करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. यात जगातल्या सर्वोत्तम विद्यापीठांपैकी दहा ते बारा विद्यापीठं आणली जाणार आहेत, अशाच प्रकारच्या दोन विद्यापीठांशी आज करार झाले आहेत. या अंतर्गत दोन्ही विद्यापीठं प्रत्येकी पंधराशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वेव्हज अर्थात जागतिक दृकश्राव्य शिखर परिषदेत दुसऱ्या दिवशी आज जागतिक माध्यम संवाद कार्यक्रमाचं आयोजन आज करण्यात आलं. तंत्रज्ञान आणि परंपरा हातात हात घालून जायला हव्यात, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर या सत्राचं उद्घाटन करताना म्हणाले. तंत्रज्ञानामुळे तरुण पिढीचा अनुभव समृद्ध होतो, विकसित भारताच्या निर्मितीसाठी नवोन्मेष आवश्यक आहे, असं त्यांनी सांगितलं.

संस्कृती सर्जनशीलतेला प्रेरित करते असं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. संस्कृतीच्या वैविध्याला आपण पाठिंबा द्यायला हवा, असंही ते म्हणाले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यावेळी उपस्थित होते.

या सत्रात ७७ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. माध्यमांमधून पसरणाऱ्या चुकीच्या माहितीला आळा घालायला हवा यावर सर्व प्रतिनिधींचं एकमत झालं.

**भारत-**अमेरिका सर्जनशीलता परिसंस्थेला चालना देण्यासाठी वेव्हज् परिषदेत सत्र आयोजित करण्यात आलं. अमेरिकेचे काऊन्सलर माईक हँकी यांनी या सत्राचं उद्घाटन केलं आणि उपस्थितांना संबोधित केलं.

**भारताने** आपलं तत्त्वज्ञान, ज्ञान आणि शिकवणीच्या आधारे जगाच्या ज्ञानात भर टाकली, असं उद्योजक **निता अंबानी** म्हणाल्या. त्या वेव्हज् परिषदेत एका चर्चासत्राला संबोधित करत होत्या. भाषा, साहित्य, संगीत आणि वैद्यकीय ज्ञान अशा सर्वच क्षेत्रात भारतानं जगाला भरीव योगदान दिलं आहे, असं त्या म्हणाल्या.

**वेव्हज्** परिषदेत आज रेडिओ रिइमॅजीन्ड या विषयावर चर्चासत्र झालं. नभोवाणी हे खरोर लोककल्याणासाठी काम करणारं माध्यम असून भारत ही नभोवाणीची सर्वात मोठी बाजारपेठ आहे, असं प्रसारभारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी शशी वेम्पट्टी यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

वेव्हज् परिषदेत वेव्हज् बाजारने पहिल्या दीड दिवसात चित्रपट, संगीत, ॲनिमेशन, व्हीएफएक्स आदी क्षेत्रात २५४ कोटी रुपयांचा व्यवसाय केला.  पुढल्या दोन दिवसात यात आणखी भर पडेल, असं माहिती आणि प्रसारण खात्याचे सचिव संजय जाजू यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. वेव्हज् बाजारमधल्या खिडकी गाँव या प्रकल्पाने एशियन सिनेमा फंडशी व्हीएफएक्स करार केला. या प्रकल्पाचं मूल्य दोन कोटी रुपये आहे. जागतिक प्रेक्षकांसाठी कंटेट निर्मिती करण्याच्या उद्देशानं सध्या ओएमएल आणि गॅझप्रॉम मीडिया यांच्यात करार होणार आहे. त्याचप्रमाणे दिग्दर्शक मकिको इबाबा यांनी शिन चान इंडिया इयरची आजच्या वेव्हज् परिषदेत घोषणा केली.

**<><><><><>**

नाशिक शहरात आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या ५० दिवसांच्या उलटगणनेनिमित्त योग महोत्सव घेण्यात आला. पंचवटीत रामकुंड परिसरातल्या गौरी मैदान इथं सामूहिक योग प्रात्यक्षिकांनी योग महोत्सवाची सुरुवात झाली. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर, योग अभ्यासक आणि नागरिक यावेळी उपस्थित होते. ११वा योग दिवस देशात एक लाख ठिकाणी साजरा होईल, यादृष्टीनं नियोजन करण्यात आलं असून, त्यासाठी योगसंगम ॲप तयार करण्यात आलं असून, त्यात नोंदणी करून योगसाधना करता येईल, अशी माहिती जाधव यांनी यावेळी दिली.

**बाईट: केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव**

मुलं आणि महिलांनी कोणती आसनं करावी, तसंच आजार निहाय कोणत्या प्रकारचे योगासनं उपयुक्त ठरू शकतात याचे पॅकेजेस लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं जाधव यांनी सांगितलं. पुणे जिल्ह्यात लोणावळा इथल्या कैवल्यधाम योग संस्थेमध्ये दोन दिवसांच्या राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचं उद्घाटन केंद्रीय आयुष राज्य मंत्र्यांच्या हस्ते काल झालं.

**<><><><><>**

पुढच्या चार वर्षांत देशातलं कोणतंही गाव, शेत पाण्यापासून वंचित राहू नये, आणि देश दुष्काळमुक्त व्हावा, यासाठी केंद्र शासन कटिबद्ध आहे, असं केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांनी आज सांगितलं. अहिल्यानगर जिल्ह्यात अस्तगाव इथं गोदावरी उजवा तट कालव्यावरचं बांधकाम आणि अस्तरीकरण कामाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते.  शासन तर आपलं काम करणारंच आहे, मात्र एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकानं पाण्याचा काटकसरीनं वापर केला पाहिजे, गावातलं पाणी गावातच अडवून साठवावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अहिल्यानगरचे माजी आमदार अरुण जगताप यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं, ते ६७ वर्षांचे होते. जगताप यांनी तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष अशी अनेक महत्वाची पदं भूषवली. या पदांसह ते दोन वेळा काँग्रेसकडून विधान परिषदेवर निवडून आले होते. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही सलग दोनवेळा स्थानिक स्वराज्य संस्थामतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेले होते.

<><><><><>

१९६६ च्या साखर नियंत्रण आदेशाचा व्यापक आढावा घेऊन केंद्र सरकारनं नुकताच साखर नियंत्रण आदेश, २०२५ चा मसुदा तयार केला आहे. साखर उद्योगाला नियंत्रित करणारी नियामक चौकट सोपी आणि सुव्यवस्थित करणं हा या मसुद्याचा उद्देश आहे. या मसुद्यात खांडसरी कारखान्यांचाही समावेश केला असल्यानं हे कारखाने शेतकऱ्यांना रास्त भाव देण्यासाठी बांधील राहतील, देशभरातल्या साखरेच्या एकूण साठ्यात कच्च्या साखरेचा साठाही समाविष्ट केला जाणार असल्यानं, साखरेच्या एकूण साठ्याचे नेमके आकडे उपलब्ध होतील, त्याशिवाय घरगुती वापरासाठी आवश्यक भासणाऱ्या साखरेची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करुन सरकार इतर पर्यायांसाठी साखरेचं नियमन करू शकेल.

<><><><><>

लातूर जिल्ह्याला अंमली पदार्थांच्या व्यसनाचा विळखा नसल्याचं जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट केलं आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर आज ते वार्ताहरांशी बोलत होते. काही दिवसांपूर्वी चाकूर तालुक्यात रोहिणा या गावात अंमली पदार्थांच्या कारखान्यावर केंद्रीय महसूल गुप्तचर संस्था आणि अंमली पदार्थ विरोधी पथकाने छापा टाकला होता. या प्रकरणात ७ जणांना अटकही झाली होती. मात्र, या गावात बनवले जाणारे अंमली

पदार्थ लातूर शहर किंवा जिल्ह्यात विकले जात नसल्याचंही भोसले यावेळी म्हणाले.

<><><><><>

नागपूरच्या मध्यवर्ती कारागृह प्रशासनाच्या वतीने कारागृहातले  आरोपी आणि  सजा भोगत असलेल्या कैद्यांना त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्याची विशेष संधी देण्यात आली. कैद्यांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांच्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रशासनाने ही भेट आयोजित केली होती.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या परळी तालुक्यातल्या शेतकऱ्यांना माजलगाव उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याच्या सूचना आमदार धनंजय मुंडे  यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या. उजव्या कालव्यातून पाणी न मिळाल्यामुळे परळी तालुक्यातल्या शेतकऱ्यांची पिकं करपू लागली होती. त्यामुळे मुंडे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी भेटून पाण्याची मागणी केली होती.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. विदर्भात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४४ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//